*संगणक चालक पदाची शैक्षणीक अर्हता अद्यावत करणेबाबत...*

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

## राहुरी, जि. अहमदनगर

विद्यापीठ निर्णय जा.क्र. एमटीजी-२ (१२२)/(सं.चा.)/ ५३ /२०२१ दि. ४ जून, २०२१

<u>वाचा</u> - १. विद्यापीठ निर्णय एमटीजी-२(१२२)/४००६/१९९२, दिनांक १३ एप्रिल, १९९२.

२. कार्यकारी परिषदेच्या ३२५ व्या बैठकीतील ठराव क्र. २५/का.प.बै. ३२५ (०५.०७.२०१९),

३. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या १०४ व्या बैठकीतील ठराव क्र. १८/१०४/दि. २२/०२/२०२१,

४. सहाय्यक-कुलसचिव (प्रशासन) यांचे पत्र जा.क्र. प्रशासन/ब-२/संगणक चालक/शैक्षणिक अर्हता/विद्यापीठ निर्णय/१०५४/२०२१, दि. १२/०४/२०२१.

### पार्श्वभूमी -

महात्मा फुले कृषि विद्यापीठातर्गत संगणक चालक या संवर्गातील एकुण ३ पदे मंजूर असून या पदांसाठी संदर्भ क्र. १ अन्वये शैक्षणिक अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण व संगणक चालविण्याचा ५ वर्षांचा अनुभव अशी निश्चित करण्यात आलेली आहे.

तथापी, संगणक चालक या पदाची शैक्षणिक अर्हता व वेतनश्रेणीचे अवलोकन केले असता संगणक चालक या पदाशी निगडित निम्न संवर्गातील सहायक (संगणक) पदांची शैक्षणिक अर्हता ही संगणक चालक या पदापेक्षा जास्त असून वेतनश्रेणी मात्र कमी आहे. त्यामुळे संगणक चालक या पदाची शैक्षणिक अर्हता अद्ययावत करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने, संगणक चालक या पदाची शैक्षणिक अर्हता अद्यावत करणे विचाराधीन होते. त्यानुसार, संगणक चालक या पदाची शैक्षणिक अर्हता अद्यावत करणेबाबतच्या प्रस्तावास कार्यकारी परिषदेने संदर्भ क्र. २ अन्वये व महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद यांनी संदर्भ क्र. ३ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

### विद्यापीठ निर्णय -

महात्मा फुले कृषि विद्यापीठातंर्गत संगणक चालक या संवर्गातील एकूण ३ मंजुर पदांकरीता संदर्भ क्र. १ च्या विद्यापीठ निर्णयाव्दारे शैक्षणिक अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण व संगणक चालविण्याचा ५ वर्षांचा अनुभव अशी निश्चित करण्यात आली होती. तथापी सहायक (संगणक) या कनिष्ठ पदापेक्षा सदरील अर्हता कमी असल्याने ती अद्यावत करणे आवश्यक असल्याने कार्यकारी परिषदेने संदर्भ क्र. २ अन्वये व महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद यांनी संदर्भ क्र. ३ अन्वये संगणक चालक या पदाच्या शैक्षणिक अर्हता अद्यावतीकरणास मान्यता प्रदान केलेली आहे. त्याअनुषंगाने संगणक चालक या पदाच्या खालील सुधारीत शैक्षणिक अर्हतेस मा. कुलगुरु मान्यता प्रदान करीत आहे.

| पदाचे नाव व वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता | |
|---|---|---|
| | सध्याची शैक्षणिक अर्हता | सुधारीत शैक्षणिक अर्हता |
| संगणक चालक वेतनश्रेणी - ९३००-३४८०० व ग्रेडवेतन ४२००/- (सहाव्या वेतन आयोगानुसार) | माध्यमिक शालांत परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण व संगणक चालविण्याचा ०५ वर्षांचा अनुभव | संगणक शास्त्रातील पदव्युत्तर पदवी / अभियांत्रिकी शाखेमधील तत्सम पदवी (कॉम्प्युटर इंजिनिअरींग / कॉम्प्युटर टेक्नोलॉजी / नेट-वर्कींग / इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग) आणि कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेमधील संबंधीत क्षेत्रातील दोन (०२) वर्षाचा अनुभव. **किंवा** पॉलिटेक्निक डिप्लोमा इन कॉम्प्युटर इंजिनिअरींग / कॉम्प्युटर टेक्नोलॉजी / नेट-वर्कींग/ इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग किंवा तत्सम पदविका आणि सहायक (संगणक) या पदावरील किंवा रु. ५२००-२०२०० अधिक ग्रेड वेतन रु. २४००/- वा त्यापुढील वेतन संरचेनेतील पदावर ०५ (पाच) वर्षाचा शासकीय संस्थेतील संगणक विषयक कामाचा अनुभव. |

सदरचा विद्यापीठ निर्णय नियंत्रक, म.फु.कृ.वि., राहुरी यांचे औपचारीक संदर्भ क्र. १५४, दि. २/६/२०२१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

**सही/-**
**(महानंद माने)**
**कुलसचिव**

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव -**

१. संचालक, विस्तार शिक्षण / संशोधन / शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
२. अधिष्ठाता (कृषि), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
३. सहयोगी अधिष्ठाता (सर्व),
४. प्रकल्प अधिकारी, कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, काष्टी, मालेगाव,
५. विभाग प्रमुख (सर्व),
६. सहयोगी संशोधन संचालक (सर्व),
७. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय (सर्व),
८. प्रभारी, कृषि संशोधन केंद्र / प्रकल्प (सर्व),
९. विद्यापीठ ग्रंथपाल / नियोजन अधिकारी, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
१०. नियंत्रक / विद्यापीठ अभियंता, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
११. उप कुलसचिव (प्रशासन) / (विद्या), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
१२. अधिदान व लेखाधिकारी / सहाय्यक नियंत्रक / सहाय्यक कुलसचिव (सर्व),
१३. मा. कुलगुरु / कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.

**प्रत माहितीस्तव -**

१. सहसंचालक (प्रशासन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे ७.

ASPadvi
**(आशा पाडवी)**
**उप-कुलसचिव (प्रशासन)**